## राज्यशास्त्र विभाग अहवाल

**(session 2021-22)**

शैक्षणिक सत्र २०२१–२२ मध्ये राज्यशास्त्र विभागाचे वतीने विविध अभ्यासपुरक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.त्यातील प्रमुख कार्यक्रम पुढीलप्रमाणे:–

१) **सामान्य ज्ञान स्पर्धा परीक्षेचे आयोजन**:–बुलडाणा जिल्हा राज्यशास्त्र अध्ययन व संशोधन मंच तसेच श्री शिवाजी महाविद्यालय चिखली यांचे संयुक्त विद्यमाने दिनांक २८ ऑगस्ठ २१ रोजी महाविद्यालय स्तरावर सामान्य ज्ञान स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.यात एकून ७६ विद्यार्थी सहभागी झाले यापैकी (१) दत्तात्रय पंढरी गाढवे व (२) श्रीकृष्ण शिंदे हे दोन विद्यार्थी अव्वल क्रमांकाने उत्तीर्ण झाले.बुलडाणा जिल्हयातील प्रत्येक महाविद्यालयातुन अव्वल दोन दोन विद्यार्थी यांची जिल्हास्तरीय ऑनलाईन सामान्य ज्ञान स्पर्धा परिक्षा दिनांक १८/०९/२०२१ (शनिवार) रोजी आयोजीत करण्यात आली होती.

२) **निवडणुक साक्षरता मंडळाची स्थापना**:–युवा मतदार नोंदणी व मतदार जागृती महाविद्यालयीन विद्यार्थ्यात व्हावी म्हणुन १२/०८/२०२१ रोजी कार्यकारणी स्थापन करण्यात आली. राष्ट्रीय सेवा योजना व राज्यशास्त्र विभाग यांचे संयुक्त विद्यमाने मतदार जागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला.यावेळी कार्यक्रमाचे उदघाटक कार्यक्रम अंतर्गत गुणवत्ता कक्षाच्या प्रमुख (IQAC-CO-ORDINATOR) डॉ व्ही.यु.पोची तर अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ ओमराज देशमुख हे होते.राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ.जे.जे.जाधव यांनी मार्गदर्शन केले तर राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक प्रा.स्वप्नील काळे यांनी आभार मानले.

३) **संशोधन पध्दती विषयावर कार्यशाळा**:–मानव्यशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांना संशोधनाची मुलतत्वे व पध्दती यांचे शास्त्रीय ज्ञान देण्याचे दृष्टीने राज्यशास्त्र विभाग व महाविद्यालयाचा पी.एच.डी सेल यांचे संयुक्त विद्यमाने कार्यशाळेचे आयोजन सप्टेंबर २०२१ रोजी करण्यात आले होते.यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष (संगाबाअवि अमरावती) तथा प्राचार्य डॉ.सुभाषराव गवई हे उपस्थित होते. या कार्यक्रमात अनेक पदवित्तर व संशोधन कार्य करित असलेले विद्यार्थी व प्राध्यापक उपस्थित होते.कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ ओमराज देशमुख हे होते.प्रास्तविक प्रा.डॉ.जे.जे.जाधव यांनी तर सुत्रसंचालन डॉ.अनुराधा मुळे व आभार प्रा.डॉ.व्ही.आर.पडवाल यांनी मानले.

४) दिनांक ५ डिसेंबर २०२१ रोजी राज्यशास्त्र विभाग व राज्यशास्त्र अध्ययन व संशोधन मंच,बुलडाणा जिल्हा यांनी वर्षभर राबविलेल्या विविध कार्यक्रमाचा जिल्हास्तरीय बक्षीस वितरण कार्यक्रम आयोजित केला.यावेळी जिल्हयाच्या विविध महाविद्यालयातील गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले.तसेच विविध क्षेत्रात उल्लेखनिय कामगिरी करणाऱ्या प्राध्यापकांनाही सन्मानित करण्यात आले.या कार्यक्रमानंतर मंचाची जिल्हा कार्यकारीणीची निवड करण्यात आली.

५) **माहीती अधिकार –व्याख्यान**:–दिनांक १२ ऑक्टोंबर २०२१ रोजी बुरूंगले महाविद्यालय शेगाव यांनी आयोजित "माहीती अधिकार " या विषयावर प्रा.जे.जे.जाधव यांचे व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.प्राचार्य डॉ.खडसन हे अध्यक्षस्थानी होते तर सुत्रसंचालन व आभार प्रा.योगेश वायाळ यांनी केले.

६) दिनांक १५ ऑक्टोंबर २०२१ रोजी वाशिम येथील प्रा.शुभांगी यांनी आयोजित भारतिय संविधान व्याख्यान मालेत "भारतीय लोकशाही व निवडणुक आयोग" या विषयावर राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.जे.जे.जाधव यांनी ऑनलाईन व्याख्यान दिले.

७) **संविधान दिनाचे आयोजन**:–दिनांक २६ नोव्हेंबर २०२१ रोजी राज्यशास्त्र विभागाचे वतीने संविधान दिनाचे आयोजन करण्यात आले.राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ.जे.जे.जाधव यांनी संविधानाची निर्मिती,महत्व व मुल्य या विषयावर मार्गदर्शन केले.याप्रसंगी प्राचार्य

डॉ. ओमराज देशमुख,वरूड येथील माजी प्राचार्य डॉ देवानंद अतकरे,प्रा.डॉ.व्ही.यू.पोची,प्रा.डॉ.बोबडे,डॉ.माल्टे,डॉ.पडवाल,डॉ.सुनिता कलाखे,डॉ.अनुराधा मुळे,राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रा.स्वप्नील काळे,राष्ट्रीय छात्र सेनेचे प्रा.लेफ्टनंट किरण पडघान तसेच अनेक कर्मचारी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कनिष्ठ महाविद्यालय राज्यशास्त्र विभागाचे प्रा.डी.आर.उन्हाळे यांनी केले.

८) **जागतिक मानवी हक्क दिन:**—राज्यशास्त्र विभाग व राष्ट्रीय सेवा योजना यांचे संयुक्त विद्यमाने "जागतिक मानवी हक्क दिनाचे" आयोजन करण्यात आले होते.'मानवी हक्क अर्थ व स्वरूप'या विषयावर प्रा.डॉ.जे.जे.जाधव यांनी मार्गदर्शन केले.कार्यक्रमास मा. प्राचार्य डॉ ओमराज देशमुख, IQAC समन्वयक प्रा.डॉ.व्ही.यु.पोची,डॉ.एस.एम.कलाखे,डॉ.अनुराधा मुळे,प्रा.डॉ.गणेश माल्टे,प्रा.डॉ. विष्णू पडवाल,प्रा.डॉ.जुक्कलकर हे उपस्थित होते.कार्यक्रमाचे संचालन राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक प्रा.स्वप्नील काळे यांनी तर आभार प्रदर्शन प्रा.डॉ.सुनिता कलाखे यांनी केले.

९) **राष्ट्रीय मतदार दिन:**—राज्यशास्त्र विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांचे संयुक्त विद्यमाने 'राष्ट्रीय मतदार दिवस' अनुषंगाने 'मतदार जागृती व लोकशाही' या विषयावर व्याख्यान व मार्गदर्शन प्रा.जे.जे.जाधव,प्राचार्य डॉ.ओ.एस.देशमुख यांनी केले.कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक प्रा.स्वप्नील काळे यांनी केले.

१०) **अभिरूप युवा संवाद** :विद्यार्थ्यांमध्ये सांसदिय लोकशाही परंपरा व मुल्य रूजावीत म्हणुन 'युवा बिरादरी (भारत) या संस्थेच्या वतीने दि. 05/12/2021 रोजी विदर्भ विभाग पातळीवर श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे शिक्षण महाविद्यालय येथे युवा संसद स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत महाविद्यालयाच्या २१ विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन उत्तेजनार्थ चौथा क्रमांक पटकाविला. तसेच ५००० रू रोख बक्षीस प्राप्त केले.यावेळी मार्गदर्शक म्हणून प्रा.डॉ.जे.जे.जाधव व प्रा.स्वप्नील काळे हे होते.

Shri Shivaji Sci. & Arts College Chikhli, Dist. Buldana

OSDeshmukh

**प्राचार्य**
**श्री शिवाजी विज्ञान व कला महाविद्यालय**
**चिखली जि. बुलडाणा**